UGC Approved Sr. No. 49366


SRJIS

Online ISSN -2278-8808

Printed ISSN- 2349-4766

GLOBALLY INDEXED

IMPACT FACTOR SJIF 2016 6.177




An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2017. VOL. 6, ISSUE -34

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

5

Scanned with OKEN Scanner

SJIF 2016 = 6.177

Online ISSN 2278-8808

Printed ISSN 2349-4766

An International, Peer Reviewed, & Referred Quarterly

**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**

**OCT-DEC, 2017, VOL-6, ISSUE-34**

266 भारतीय शेतीची आधुनिकता आणि सद्यस्थिती

*प्रा. डॉ. कदम प्रमोदिनी विठ्ठल (1173-1181)*

267 मानव संसाधन व्यवस्थापन :– श्रमशक्तीचा आदर्श स्त्रोत

*डॉ. डी.एस. पाटील (1182-1188)*

268 भारतातील कृषि क्षेत्र आणि कर्जपुरवठा

*प्रा.डॉ. अरुण तवार & प्रा.डॉ. शिवाजी पाते (1189-1192)*

269 औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्राचे योगदान

*प्रा.डॉ.आर.डी. भोसले (1193-1196)*

270 भारतीय शेतीसमोरील आव्हाने आणि शेती विकास

*प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे (1197-1202)*

271 मानव विकास निर्देशांक व भारतीय मुस्लिम समाज– अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालूक्यातील शहरी भागाचा एक व्यष्टी अध्ययन

*प्रा. डॉ. विजयकुमार वावळे, शायिन यासिन शेख (1203-1209)*

272 भारतीय अर्थव्यवस्था आणि नोटबंदी एक अभ्यास

*अनंत श्रीराम राठोड (1210-1213)*

273 वस्तू व सेवा करांचा लघू व मध्यम उद्योगांवर पडणारा प्रभाव

*प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव (1214-1216)*

274 कातकरींचा सामाजिक दृष्टीकोन : एक अभ्यास

*डॉ. आर. के. दातीर & श्री. विनायक तु. खातळे (1217-1220)*

275 भारताचे विदेश व्यापार धोरण : निर्यात वद्धीतील प्रमुख अडथळा ?

*प्रा. डी. डी.गव्हाणे & प्रा. डॉ. एस. जी. वैद्य (1221-1226)*

276 अहमदनगर जिल्ह्यातील नगरपालिकांच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांचा चिकित्सक अभ्यास

*संगिता रामेश्वरलाल जांगीड & प्रा.डॉ.ए.एम.पवार (1227-1229)*

277 मानवी विकास निर्देशांक
*डॉ. सुरेखा भिंगार दिवे (1230-1232)*
278 कॅशलेस अर्थव्यवस्था
*डॉ. मनिषा कारभारी आहेर (1233-1236)*
279 भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राची भूमिका
*डॉ. नासिकेत गो. सुर्यवंशी & प्रा. गोविंद रा. काळे (1237-1240)*
280 जीएसटी चा ग्राहकांवर पडणारा प्रभाव
*प्रा. डॉ. शेवाळे चंद्रकला नामदेव (1241-1243)*
281 विमुद्रीकरण: अपेक्षा आणि वास्तव
*डॉ. दिपक एन.कारे (1244-1248)*
282 सूक्ष्मवित्त आणि स्वयंसहाय्यता बचतगट
*मनिषा राजेंद्र सामंत (1249-1253)*
283 परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम
*गणेश वामन (1254-1255)*
284 निती आयोग अर्थव्यवस्थेची गरज
*प्रा. वाकचौरे बी. एस (1256-1258)*
285 वस्तु व सेवा कराचे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिणाम
*श्री. संतोष ज्ञानदेव जाधव & प्रा.डॉ.एस.जी.वैद्य (1259-1262)*
286 पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे अहमदनगर जिल्हयातील सामाजिक, आर्थिक परिणामांचे अध्ययन
*गोरक्ष कडवे (1263-1267)*
287 वस्तू व सेवा कर प्रणालीचे परिणाम व भवितव्य
*प्रा. सीमा चव्हाण (1268-1272)*
288 निश्चलनीकरण (**Demonetization of Currency** )
*डॉ. विश्वास र. कदम (1273-1279)*
289 भारतातील कृषी यांत्रिकीकरणाची प्रगती आणि भवितव्य
*प्रा. बापू ठका खिलारी, डॉ. संभाजी भाउराव काळे (1280-1285)*
290 भारतातील शेतक-यांच्या आत्महत्या - कारणे व उपाय
*प्रा. सुकुमार दत्ता पाटील & सौ. के. जी. ताम्हाणे (1286-1290)*
291 मानव विकास निर्देशांकाबाबत भारतातील सद्य:स्थिती
*प्रा. संदेश सदाशिव तावडे & प्रा.डॉ. पंकज त्र्यंबक निकम (1291-1294)*
292 वस्तु आणि सेवा कर आणि त्याचे परिणाम
*डॉ. डी. ए. सोनवणे (1295-1297)*

Scanned with OKEN Scanner

293 वस्तु आणि सेवा कर (GST) ः रचना, परिणाम आणि भवितव्य
*प्रा. डॉ. हिरालाल वामन चव्हाण & प्रा. सुरेश हिलाल पाटील (1298-1303)*
294 भारतात श्रमीकांच्या वेतनासंबंधी धोरण ही काळाची गरज
*डॉ. धुंदले संगिता आर. (1304-1307)*
295 जीएसटीचा भविष्यात तेलाच्या किंमतीवरील परिणाम अभ्यासने
*प्रा. डॉ. संजय परशराम देवरे (1308-1310)*
296 वस्तु व सेवा कराचा भारतीय शेतीवर होणारा परिणाम
*नितिन नारायण जाबरे (1311-1314)*
297 शिक्षण प्रणाली आणि आर्थिक विकास
*श्रीमती. कदम जयश्री लक्ष्मण (1315-1317)*
298 महाराष्ट्र राज्यातील मानव विकास निर्देशांकाच्या परिणामकारकतेचे अध्ययन
*प्रा. डॉ. पवार नानासाहेब चंद्रभान (1318-1326)*
299 जलसंवर्धननिती सुराज्य निर्मिती
*रणाते सुनिता विजय (1327-1336)*
300 ई — बॅकिंग सेवा व फायदे
*प्रा. डॉ. आदिनाथ रावसाहेब घोलप (1337-1339)*
301 महाराष्ट्र शासनाच्या कृषीविषयक अंदाजपत्रकीय तरतूदीचा अभ्यास
*देशमुख अश्विनी हरिश्चंद्र & प्रा. डॉ. काळे एस. बी. (1340-1343)*
302 भारतीय शेतीचा नियोजनात्मक विकास
*डॉ. अनिल दि.वाडकर (1344-1352)*
303 भारतातील लोकसंख्या रचनेतील बदलांचा अभ्यास
*डॉ. कदम प्रमोदिनी & कु. जगताप मंगल बाबासाहेब (1353-1357)*
304 असंघटीत श्रमिकांतील आर्थिक विषमता
*प्रा.डॉ.आबासो ह.शिंदे (1358-1363)*
305 बाल मजुरी : समस्या, कारणे आणि परिणाम
*प्रा. सतिश आशिनाथ गोंडे (1364-1367)*
306 भारतातील पर्यटन विकास
*प्रा. सुनील दशरथ साळवे (1368-1379)*
307 जीएसटी : स्वरूप व रचना
*प्रा. डॉ. ए. टी. तवार (1380-1384)*
308 नाशिक जिल्ह्यातील टोमॅटो वितरण साखळ्या
*प्रा. साहेबराव दौलत निकम (1385-1389)*
309 वस्तू व सेवा कर प्रणाली
*पांडुळे अंजली विष्णु (1390-1394)*

310 आदिवासी शिक्षण– दशा आणि दिशा
*मोरे रविंद्र गोरक्षनाथ (1395-1396)*
311 ग्रामीण विकासातील पंचायतराज संस्थांची भूमिका
*तुवर जालिंदर गोरक्षनाथ (1397-1398)*
312 अकोला जिल्हयातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन
*डॉ. कु. प्राजक्ता वि. पोहरे & डॉ. रामेश्वर मा. भीसे (1399-1410)*
313 जीएसटी कर प्रणालीची संरचना आणि परिणाम
*पाऊलबुध्दे अनुराधा रामभाऊ & प्रा. डॉ. अशोक कोरडे (1409-1411)*
314 कृषी विकास योजनांचा शेती क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा चिकीत्सक अभ्यास
*डॉ. राजेंद्र भोसल & गायकवाड ज्योती नानासाहेब (1412-1417)*
315 स्वचछता अभियानातंर्गत राबविण्यात येणा-या स्वच्छभारत अभियानाचा अभ्यास
*डॉ सुहास आव्हाड & दिगांबर ज्ञानदेव नलगे (1418-1420)*
316 आर्थिक सुधारणा काळातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा महाराष्ट्र राज्य सकल अंतर्गत उत्पादनावरील परिणाम
*प्रा. मदन शेळके (1421-1426)*
317 स्वंयसहाय्यता समुह बॅंक संलग्न कार्यक्रमांचा आढावा
*प्रा. संतोष एम. वाघमारे & डॉ. अजय पी. कुटे (1427-1430)*
318 भारतात परकीय भांडवलाची भूमिका
*प्रा. वैषाली योगराज भेले (1431-1435)*
319 सेंद्रिय शेती पदधती काळाची गरज
*कु. रुपाली जाधव (1436-1437)*
320 शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्त्या : 2011 ते 2017 (संदर्भ : नाशिक जिल्हा)
*प्रा. डॉ. अनिल डी. पवार (1438-1442)*
321 शाश्वत विकासासाठी सेंद्रीय शेतीचे महत्त्व : एक अभ्यास
*प्रा. एम.व्ही. हिरे (1443)*
322 वस्तु व सेवा कर – वाटचाल आणि प्रत्यक्ष आकारणी
*प्रा. डॉ. सुनील पं. उगले (1444-1449)*
323 मध्ययुगीन भारतातील उद्योग, व्यापार व त्याचा प्रभाव
*प्रा. तुळशीदास मोकल (1450-1453)*
324 जागतिकीकरणाचा कृषीमाल विपणन व्यवस्थेवरील परिणाम
*प्रा. डॉ. आर के जाधव (1454-1460)*
325 भारतातील विविध कृषी आधारित उदयोगांच्या समस्या आणि संधी
*श्री . गणेश तुकाराम टाव्हरे (1461-1475)*

Scanned with OKEN Scanner

326 भारतीय अर्थव्यवस्थेवरील 'विमुद्रीकरण' परिणामांचे अध्ययन
*प्रा. डॉ. ज्ञानेश्वर एन्. सोनवणे (1476-1481)*
327 भारतातील कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने
*प्रा. डॉ. सुनिल मोहटे (1482-1486)*
328 रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, अलिबाग ही एक रायगड जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता वचत गटांना प्रोत्साहित करणारी संस्था
*प्रा. लोहकरे शत्रुघ्न नामदेव & प्रा. डॉ. मनिषा कर्णे (1487-1494)*
329 ***कृषी अर्थशास्त्र महाराष्ट्रातील तेलबियांचे लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन यांचे विश्लेषण (२०१० ते २०१६)***
*प्रा. विश्वनाथ गजानन कोटकर (1495-1499)*
330 ***आदिवासी समाजाच्या समस्या***
*अंजली पंढरीनाथ लंगोटे (1500-1503)*
331 नवीन अर्थिक सुधारणानंतरचे भारताचे परकिय व्यापार धोरण
*प्रा. सुहास सुदाम क्षिरसागर (1504-1508)*
332 महिला सबलीकरणाचा सुकर मार्ग : स्वयंसहाय्यता बचत गट
*डॉ. अंजली रामचंद्र कदम – नारायणे (1509-1511)*
333 महाराष्ट्रातील पशुधन
*श्रीमती होन कविता संपत (1512-1515)*
334 जीएसटी– वस्तु व सेवा कर
*गुजर तृप्ती द्वारकनाथ (1516-1518)*
335 भारतीय शेतमजुरांच्या समस्यांचा अभ्यास
*डॉ. शिवाजी झांझुरणे & प्रा. डॉ. अरूण तवार (1519-1526)*
336 अहमदनगर जिल्हाच्या आर्थिक विकासात ग्रामपंचायतींची भुमिका
*कडलग सुवर्णा उत्तमराव & प्रा. डॉ. भोसले आर. डी. (1527-1530)*
337 भारतीय कर व्यवस्थेतील एक क्रांतिकारी बदल; जीएसटी
*डॉ.सदाशिव सिताराम मेंगाळ (1531-1534)*
338 प्राथमिक सहकारी दूध विकास संस्थांच्या कामगिरीचे अध्ययन
*डॉ. नितिन अशोक मुटकुळे (1535-1537)*
339 महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र योजनेचा रोजगार निर्मितीमधील योगदानाचा अभ्यास
*गणेश मच्छिंद्र चोर (1538-1540)*
340 सेंद्रिय शेतीचे महत्त्व
*प्रा. डॉ. किशोर रंगनाथ डोंगरे & प्रा.प्रविण बबनराव आहेर (1541-1544)*
341 **DEMONETIZATION AND CASHLESS TRANSACTIONS**
*Dr. Narayan N. Gadhe (1545-1547)*

Scanned with OKEN Scanner

342 A STUDY OF E-BANKING IN INDIA-PROSPECTS AND CHALLENGES

*Dr. Sayyad Mahejabin Dildar (1548-1552)*

343 DEMONETIZATION AT AFFECTED INDUSTRIALIZATION AND ECONOMICAL SITUATION

*Dr. Satish A .Bhosale (1553-1557)*

344 LABOUR LEGISLATION AND SOCIAL SECURITY FOR UNORGANIZED SECTOR

*Mrs. Sangita S. More (1558-1563)*

345 PERFORMANCE APPRAISAL

*Tushar D. Bagul (1564-1569)*

Scanned with OKEN Scanner

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES ISSN: 2349-4766 (P), 2278-8808 (E)



# जीएसटीचा भविष्यात तेलाच्या किंमतीवरील परिणाम अभ्यासने

**प्रा. डॉ. संजय परशराम देवरे**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव कॅम्प ता. मालेगाव जि. नाशिक*

अप्रत्यक्ष कर सुधार प्रक्रिया भाग म्हणून १९८६ मध्ये पंतप्रधान राजीव गांधी मंत्रीमंडळातील अर्थमंत्री विश्वानाथ प्रतापसिंग यांनी मुल्यवर्धित कर प्रणाली ;टाज्द्ध अस्तिवात आली. त्यातूनच पुढे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी व त्यांची आर्थिक सल्लागार समिती (आय. जी. पटेल, विमल जलान, सी रंगराजन) ने जीएसटी चे मॉडेल डिझाईन केले. युपीए सरकारच्या काळात पी. चिदंबरम यांनी हे प्रक्रिया पुढे तशीच चालू ठेवली. यानंतर २०१४ मध्ये मोदी सरकारचे वित्तमंत्री जेटली यांनी जीएसटी बिल लोकसभेत सादर केले. १६ ऑगस्ट २०१६ दुरूस्ती बिल पास झाले, १ जुलै २०१७ ला हे बिल लागु करण्यात आले. थोडक्यात वेगवेळ्या कर प्रणालीचा अस्त झाला जीएसटीच्या रूपाने एक नवीन कर प्रणालीचा आरंभ झाला. एक नवीन अध्यायाची सुरूवात भारतीय कर प्रणालीत सुरू करण्यात आली. म्हणजे वेगवेगळी कर प्रणाली अस्तला गेली. त्याजागी जीएसटीच्या रूपाने एकच कर प्रणाली अस्तित्वात आली. परंतू त्यात करांच्या दरात ५ः, १२ः, १८ः, २८ः असे वेगवेगळे कर आकारले गेले. या करातून आवश्यक उपभोगाच्या वस्तूंना करातून वगळ्यात आले व इतर सर्व वस्तूंना जीएसटी अतंर्गत आणण्यात आले. परंतु अजुन पर्यंत पेट्रोल व डिझेल यांना जीएसटीच्या कक्षेत आणले गेले नाही. जर भविष्यात ते जीएसटीच्या प्रणालीत आणले तर त्यांच्या किंमतीवर व सरकारच्या उत्पन्नावर काय परिणाम होईल याचा अभ्यास करता येईल.

**उद्दिष्टे :**

१) जीएसटीच्या कक्षेत पेट्रोल–डिझेल आणल्यास त्यांच्या किंमतीवरील परिणाम अभ्यासने

२) जीएसटीमुळे पेट्रोल–डिझेल रूपाने मिळणाऱ्या सरकारच्या उत्पन्नावर होणारे परिणाम अभ्यासने ऱ्य

**गृहीत :** पेट्रोल–डिझेलच्या कर रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नात जीएसटीमुळे घट होईल.



Scanned with OKEN Scanner

**माहिती संकलन/संशोधन पध्दती :** प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. यासाठी संदर्भग्रंथ, लेख, मासिके, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे व अधिकृत संकेत स्थळ यांचा वापर केलेला आहे.

**विश्लेषण :**

जीएसटी पूर्वी परिस्थिती

जुलै २०१७ पासून जीएसटी लागू करण्यात आला. त्यानुसार वेगवेगळ्या वस्तूवर वेगवेगळे जीएसटीचे दर लागू करण्यात आले ते दर म्हणजे ५:, १२:, १८:, २८: लावण्यात आले. आवश्यक उपभोग्य वस्तूंना शुन्य जीएसटी लागू करण्यात आला. परंतु पेट्रोल—डिझेल यांना आजूनपर्यंत जीएसटी लागू करण्यात आलेला नाही कारण पेट्रोल—डिझेल पासून सरकारला मोठे उत्पन्न मिळते. हे उत्पन्न सोडण्याची सरकारची तयारी नाही. त्याची मिमांसा पुढीलप्रमाणे करता येते. केंद्र सरकार क्रुड ऑईलची आयात फक्त २०.१९ पैसे पेट्रोल तर डिझेल २०.१९ या किंमतीत आयात करते त्यानंतर ते शुध्द (रिफाईन) केले जाते. रिफाईननंतर त्याची किंमत २९.५३ पैसे पेट्रोल व २९.१२ पैसे डिझेल ऐवढी किंमत होते. यानंतर सरकार त्यावर तीन पध्दतीने कर आकारते ते म्हणजे केंद्रिय उत्पदन शुल्क, मुल्यवर्धित कर ;टाज्द्ध व वितरकांचे कमिशन यामुळे इंधनांच्या किंमतीत मोठी वाढ होते ही वाढ खालील प्रमाणे ( आकडेवारी सप्टेंबर २०१७ दिल्लीत)

| | शुध्द इंधन किंमत | केंद्रिय उत्पादन शुल्क | वॅट | वितरकांचे कमिशन | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १. पेट्रोल | २९.५३ पैसे | २१.४८ पैसे | १४.६४ पैसे | ३.२३ पैसे | ६४.८८ पैसे |
| २. डिझेल | २९.१२ पैसे | १७.३३ पैसे | ०८.४८ पैसे | २.१७ पैसे | ५७.०६ पैसे |

आता दिल्लीतील पेट्रोलची किंमत ७०.४८ पैसे तर डिझेलची किंमत ५८.८८ पैसे, मुंबई—७३.२५ पैसे, ६१.५४ पैसे, कलकत्ता — ७३.२५ पैसे, ६१.५४ पैसे, चेन्नई — ७३.०९ पैसे, ६२.०२ पैसे अशा किंमतीना विकले जात आहे. यानुसार सरकारला पेट्रोल—डिझेल वरील करांमुळे गेल्या चार वर्षात पुढील प्रमाणे उत्पन्न मिळाले

**सरकारी उत्पन्नाची आकडेवारी पुढीलप्रमाणे**

| सन | सरकारचे उत्पन्न (कोटी रू.) | एकूण निवळ वाढ (कोटी रू.) |
|---|---|---|
| २०१२—१३ | ४६,९२६ | — — |
| २०१३—१४ | ५०,२२२ | ३२९६ |
| २०१४—१५ | ७५,४४१ | २५,२१९ |
| २०१५—१६ | १.९९ सीं ब्तण | १,२३,५५९ |

वरील आकडेवारीवरून लक्षात येते की पेट्रोल—डिझेलवरील करू रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात ( २०१५—१६—१,२३५५९ ब्त.) वाढ होत आहे.



Scanned with OKEN Scanner

**जीएसटी नंतर :** नुकतीच केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धमेंद्र प्रधान यांनी पेट्रोल—डिझेलला जीएसटीच्या कक्षेत आणण्याची मागणी केली. परंतु ही मागणी नजीकच्या काळात पूर्ण होण्याची शक्यता नाही. जीएसटी लावल्यास याचे चार कर दर आहेत. त्यापैकी सर्वाध्कि दर २८: आहे समजा २८: जीएसटी लागू झाल्यास दिल्लीमध्ये ३०.५५ रूपये पेट्रोलच्या मुळ किंमतीवर फक्त ०८.५६ रू कर द्यावा लेगेल. त्यात वितरकाचे ३.५७ रू कमिश्न धरल्यास पेट्रोलची किंमत फक्त ४२.६८ रूपयावर जाईल म्हणजे एकदम २८.८० रूपयांनी (७०.४८—४२.६८त्र २८.८०) किंमत कमी होईल. अशीच परिस्थिती डिझेलच्या बाबतीत घडेल. तर डिझेलच्या मुळ ५८.८८ पैसे किंमतीवर ०८.१५ कर द्यावा लागेल त्यात वितरकांचे कमिशन २.१७ पैसे पकडल्यास डिझेलची किंमत ३९.४३ पैसे होईल म्हणजे डिझेल १९.४५ पैशांनी स्वस्त होईल. अशा किंमत घटीमुळे पेट्रोल व डिझेलच्या उत्पन्नात कर रूपाने मिळणारे उत्पन्न ३०: च्या जवळपास घटेल म्हणजे जवळपास ३७००० ब्तण २०१५—१६या वर्षात एवढ्या रूपयांची घट होईल. अशी परिस्थिती संपूर्ण देशभरात होईल. ही घट सरकारला परवडणारी नाही. म्हणून सरकार इंधनाला जीएसटीच्या कक्षेत आणणार नाही. कारण त्यामुळे इंधनाचे दर कमी होतील, केंद्राचेही उत्पन्न कमी होईल परिणामी राज्यांचेही उत्पन्न कमी होईल व राज्यांचे अवलंबित्व वाढेल ही बाब सरकारला परवडणारी नाही.

**निष्क्रष :**

इंधनाला जीएसटीच्या कक्षेत आणल्यास

१) केंद्रसरकारचा इंधन महसुल कमी होईल

२) राज्य सरकारांच्याही महसुलात घट होईल.

३) राज्याचे केंद्रावरील अवलंबित्व वाढेल.

४) काही राज्यांचे उत्पन्न कमी होवून दिवाळखोरीत निघतील

परंतु जनतेला मात्र फायदा हो णार आहे कारण पेट्रोल—डिझेलच्या किंमती कमी होतील, अप्रत्यक्षरित्या इतर वस्तूंच्या किंमतीही कमी होतील आणि महागाईतून जनतेची काही प्रमाणात सुटका होईल.

**संदर्भ :**


*१) लेख— दै. लोकसत्ता, ११ सप्टेंबर २०१७*

*२) लेख— दै. महाराष्ट्र टाईम्स, सप्टेंबर २०१७*

*३) म्बवदवउपब ंदक च्वसपजपबंस ॅममासल*

*४) जपउमेवजपदकपंण्बवउ*

*४) आधिकृत संकेत स्थळ*

ISSN-2350-0395 Volume-III, Special Issue-IV (February- 2016)

# भारतीय चलनाची घसरण : कारणे व परीणाम

**प्रा.डॉ.एस.पी.देवरे**
सहाय्यक प्राध्यापक-अर्थशास्त्र विभाग
म.स.गा.महाविद्यालय मालेगाव कॅम्प
ता.मालेगाव जि.नाशिक.

**प्रस्तावना**

अर्थव्यवस्थेत पैशाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. एकप्रकारे अर्थव्यवस्था पैशावरच उभी असलेली दिसुन येते. म्हणुनच असे म्हटले जाते की ज्याप्रकारे मानवाच्या शरीरातील रक्तवाहीन्या कार्य करतात त्याच प्रमाणे पैसा हा ही अर्थव्यवस्थेत कार्ये करीत असतो. रक्तवाहीन्या बंद पडल्या किंवा त्यात बिगाड आला तर मानवी शरीर मृत किंवा ते अकार्यक्षम होत असते. त्याच प्रमाणे पैसाचेही आहे. पैसा जेवढा मजबुत सशक्त होईल तेवढी अर्थव्यवस्थाही मजबु व सक्षम होत असते. पैशाची घसरण आंतरराष्ट्रीय पातळीवर विचारात घेतली जातो. कारण जेव्हा एका देशाचा संबध दुसऱ्या देशांशी येत असतो तेव्हा पैसाचा विनिमय त्या विशिष्ट देशाच्या चलनात केला जातो. अर्थात एका विशिष्ट देशातील चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनातील मुल्य म्हणजे विनिमय दर असतो. हा विनिमय दर स्थिर ठेवण्योच प्रमुख वैधानिक कार्ये त्या देशाची मध्यवर्ती बँक करीत असते. आणि हे कर्ये अर्थव्यवस्थेच्या सापेक्ष बदलानुसार करीत असते.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतील विचार केल्यास भारताने १९४८ मध्येच आंतरराष्ट्री करार गॅटच्या स्वरुपात केल्यामुळे जागतीक पातळीवरील बदलाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर तत्काळ प्रभाग पडतो. तसे पाहीले तर भारताला नुकतेच स्वातंत्र्य मिळाले असताना एवढी घाई करायला नको होते. एन वाघुळ हे आयसीआयसीआय या बँकेच्या चेअरमन पदाची धुरा सांभळीत असताना एका इंग्रजी वर्तमान पत्राला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी म्हटले होते ही, “ढासळणाऱ्या रुपयाच्या अवमुल्यनाचे कारण ग्रीसमध्ये नसून त्या कारणांचे मुळ आपणास आपल्या आर्थिक धोरणातच शोधावे लागेल. आपण निर्माण केलेल्या परिस्थितीसाठी बाहेरच्यांना जबाबदार धरले तर आपल्यावर विश्वास तरी कोण ठेवेल”. तसेच फेडरीक लिस्ट या फेंच अर्थशास्त्रज्ञांच्या मतानुसार “सक्षम अर्थव्यवस्था जागतीकीरणाचा भार पेलु शकते. म्हणुन कोणत्याही देशाने स्वतःची अर्थव्यवस्था मजबूत करावी. कारण कमजोर अर्थव्यवस्था असेल तर बलाढय अशा अर्थव्यवस्थेकडून केवळ पिळवणुकच होत असते. 'मोठ्या झाडाखाली लहान झाडे कोमेजुन जातात' या निसर्ग नियमानुसार विकसित बलाढया अशा देशाच्या वर्चस्वाखाली गरीब देशाचा विकास कधीच होत नसतो. याचा परीणाम केवळ फायदा कमी आणि तोटा जास्त होत असतो”. याची प्रचिती आज आपल्या देशाला येत आहे. कदाचित भारताने जागतिकीरणाच्या प्रवाहात स्वतःला झोकुन देण्यापेक्षा अलिप्त राहून विकासाची कास स्वंयस्फूर्तीने धरली असती तर आज आहे त्यापेक्षा वेगळे चित्र दिसले असते.

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :**

१) भारतीय चलनाची घसरण अभ्यासणे.
२) रुपयाच्या घसरणीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे.
३) भारीय चलनाचे घसते मुल्य सावरण्यासाठी उपाय सुचविणे.

**माहितीचे संकलण:**

प्रस्तुत संशोधन दुय्यम साधनांवर अवलंबुन असुन त्यासाठी अर्थशास्त्रातील संदर्भग्रंथ, लेख, शासनाचे अहवाल यांचा अधार घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक विश्लेषण तंत्राचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**रुपयाची घसरणे म्हणजे काय ?**

वस्तुंची किंमततीच्या मागणी- पुरवठ्यानुसार ठरते त्याचप्रमाणे पैशाचे मुल्य ही पैशाला असणाऱ्या मागणी व पुरवठ्यानुसारच ठरत असते. जेव्हा वस्तुची मागणी ही पुरवठ्यापेक्षा अधिक असते (म्हणजे पुरवठा कमी व मागणी जास्त असते) तेव्हा वस्तुंची किंमत वाढत असते. याउलट वस्तुचा पुरवठा हा त्यास असणाऱ्या मागणीपेक्षा अधिक असतो तेव्हा वस्तुंची किंमत कमी होत असते. हीच परिस्थिती पैशाचे मुल्य ठरवण्याच्या बाबतीत खरी ठरते.

वर्तमान काळात भारतीय नागरीक डॉलरची मागणी ही मोठ्या प्रमाणात करीत आहेत. परंतु डॉलरचा पुरवठा त्या प्रमाणात होत नसल्यामुळे डॉलरचे मुल्य ज्याप्रमाणे वाढत आहे त्याचप्रमाणे पैशाचे मुल्य कमी होत आहे. जगातील कोणतेही व्यवहार डॉलरच्या



Scanned with OKEN Scanner

माध्यमातुन केली जातात. कारण अमेरीकेची अर्थव्यवस्था जगातील इतर अर्थव्यवस्थेपेक्षा सर्वात जास्त सक्षम आहे. म्हणुन कोणत्याही देशातील चलनाचे मुल्य वाढवण्यासाठी डॉलरचीच मागणी केली जाते. म्हणुन डॉलरचेमुल्य उर्ध्वगामी स्वरुपाचे होत आहे.

भारतीय रुपयाच्या बाबतीतही इतर देशाच्या चलनासारखीच स्थिती आहे. म्हणजे भारतीय रुपयाचे मुल्यही सातत्याने कमी होत आहे. जुलै २०१५ मध्ये १ डॉलरला ६२ रुपये ३७ पैसे द्यावे लागत होते. तर ३१ मे २०१५ ला १ डॉलरला ६३ रुपये ५२ पैसे द्यावे लागत होते. जानेवारी २०१६ मध्ये डॉलरला जवळजवळ ६७.२८ रु. द्यावे लागत आहेत. अर्थात आपणाला पुर्वीच्या तुलनेत अधिक पैसे मोजावे लागतात. पुर्वीइतर देशातील एक डॉलरची वस्तु घेण्यासाठी जेवढे रुपये द्यावे लागत होते त्यापेक्षा आज जास्त रुपये द्यावे लागत आहेत. एका डॉलरला जेवढे अधिक रुपये द्यावे लागतात तेवढे पैशाचे मुल्य कमी झाले असे म्हटले जाते. याला पैशाची घसरण असेही म्हटले जाते.

**भारतीय चलनाच्या घसरणीची कारणे :**

**२)भाववाढ :**

राष्ट्रीय उत्पन्नाचा (वस्तू व सेवाच्या उत्पादनातील वाढीचा दर) वृध्दीदर मागणीतील वाढीच्या तुलनेत कमी असल्यामुळे वस्तू व सेवांच्या किंमतीत वाढ होत आहे. त्यामुळे परदेशातुन अशा वस्तु व सेवांची मागणी म्हणजेच आयात केली जात आहे. ही आयात करण्यासाठी डॉलरची आवश्यक असते. म्हणुन अशा डॉलरचा साठा आपल्याकडे असेण आवश्यक असतो. नसेल तर त्याची उपलब्धता कोणत्याही मार्गाने करावी लागते. म्हणजेच त्या डॉलरची मागणी वाढवावी लागते. साहजीकच डॉलरची मागणी वाढविली की डॉलरचे मुल्य वाढते आणि आपल्या चलनाचे मुल्य कमी होत आहे.

**३)क्रूड तेलांच्या किमतीत सातत्याने होणारी घसरण :**

भारत देश क्रूड तेलांच्या एकूण गरजेच्या ९० टक्के आयात करतो. या तेलाच्या किंमती सातत्याने कमी होत असल्यामुळे रुपयाचे अवमुल्यन होत आहे. आजच्या घडीला १ बॅरलक्रूड तेलाला जवळजवळ ३० डॉलर द्यावे लागत आहेत. पुर्वी १ डॉलरला ६० रुपये द्यावे लागत होते. आज तोच दर ६८ रुपयेच्या जवळपास आहे. म्हणजेच प्रति बॅरलला १२० x ६० = ७२०० रुपयावरुन १२० x ६८ = ८१६० या दराने घ्यावे लागत आहे.

**४) डॉलरचा संचय कमी :**

परकीय गुंतवणुकदारांचा आपल्यावरील विश्वास टिकून राहण्यासाठी आपल्याकडे पुरेशी परकीय गंगाजळी असणे आवश्यक असते. विदेशी गुंवतणुकदार आपल्या देशात तेव्हाच गुंतवणुक करतील जेव्हा आपल्या देशात आर्थिक स्थैर्य अबाधित राहील. आणि आर्थिक स्थैर्य विदेशी चलनाच्या मुबलकतेवर अवलंबुन असते. १९९० साली आपल्याकडे परकिय चलनाचा साठा २१ दिवसांच्या आयतीला पुरेल एवढासुध्दा नव्हता. तेव्हा भारतीय अर्थव्यवस्था दिवाळखोरीत निघाली होती. म्हणुन आपणाला विदेशी बँकेत सोने गहाण ठेवुन हा प्रश्न सोडवावा लागला होता. आजही आपल्याकडे केवळ ३०६ अब्ज डॉलर आहेत. तर कर्ज जवळजवळ ३०० अब्ज डॉलर आहे.

**५) विदेशी गुंतवणुक कमी होत आहे :**

विदेशी गुंतवणुकदार जेव्हा एखाद्या देशात गुंतवणुक करतात तेव्हा त्या देशात डॉलरचा पुरवठा वाढत असतो. परीणामी देशीय चलनाचे मुल्य वाढत असते. त्यामुळे विदेशी गुंतवणुकदाराना आकर्षित करणे गरजेचे असते. अलिकडील काळात अमेरीका बॅकांच्या कर्जाची पुर्नरचना करण्याच्या मार्गावर आहे. त्यासाठी त्यांनी एका समितीचीही स्थापना केलेली आहे. म्हणुन अमेरिका सरकार कोणते निर्णय गुंतवणुकीच्या बाबतीत घेणार आहे याबाबत आज तरी सांगता येत नाही. म्हणुन तेथील गुंतवणुकदार गुंतवणुक करताना जरा जपुनच करीत आहेत. भारतात विदेशी गुंतवणुक कमी होत असल्यामुळे डॉलरचे प्रमाण कमी झालेले आहे. विदेशी चलनाचा साठा वाढावा आणि रुपयाचे मुल्य वाढावे म्हणुन भारताचे शासन व मध्यवर्ती बँक प्रयत्न करीत आहे.

**६) अपेक्षा :**

भविष्यकाळात रुपयाचे मुल्य आणखीन कमी होईल तसेच डॉलरचे मुल्य आणखीन वाढेल या अपेक्षेने वर्तमानकाळात डॉलरची मागणी भारतीय नागरीक करीत आहेत. त्यामुळे डॉलरच ुल्य वाढत आहे आणि रुपयाचे मुल्य कमी होत आहेत.

७) व्याजदारातील वाढीमुळेही चलनाचे अवमुल्यन होत असते.

८) मौद्रिक व राजकोषीय धोरणातील समन्वयाचा अभाव असल्यामुळेही भारतीय रुपयाचे मुल्य झालेले आहे.

९) आयात निर्यातीतील वाढती तुट.



Scanned with OKEN Scanner

१०)युरोचे मुल्य बाजारात कमी झाल्यामुळे युरोची मागणी कमी होऊन डॉलरची मागणी वाढत आहे. त्यामुळे रुपयाचे मुल्य कमी झाले.

**चलनाच्या घसरणीचे परिणाम :**

१) भारतीय रुपया घसरल्यामुळे भारतीय संपत्तीची लुट मोठ्या प्रमाणात होत आहे.

२) गरीब व मध्यमवर्गीयाच्या जिवनमानाचा दर्जा खालावलेल्या आहे. त्याना दररोज पोटाला पोटभर अन्न मिळेल कि नाही याची शास्वती नाही. कारण रुपयाचे मुल्य कमी झाल्यामुळे भारतीयांची खरेदीशक्ती कमी झालेली आहे. त्याचा सर्वात जास्त फटका गरीब व सामान्य जनतेला भोगावा लागत आहे.

३) रुपयाचे मुल्य वाढवण्यासाठी सरकार मोठ्या प्रमाणावर विदेशी कर्ज घेण्याच्या प्रयत्नात आहे. आरबीआयच्या मते मार्च २०१४ अखेर भारतावर विदेशी कर्जाचा बोजा ३४२ अब्ज डॉलरचा होता. आणि आपल्याकडे ३०६ अब्ज डॉलरचा साठा आहे.

४) आयात वाढत आहे तर निर्यात कमी होत आहे.

५) रुपयांचे मुल्य वाढवण्यासाठी सरकार विदेशी गुंतवणुकदारांना प्रोत्साहन देत असल्यामुळे देशी उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष होत आहे. परीणामी देशी उद्योग बंद पडत आहेत. त्यातुन बेकारी, दारिद्र्य, आर्थिक विषमता वाढत आहे.

**उपाययोजना :**

यावर मात करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था मजबुत करणे गरजेचे आहे आणि हे करण्यासाठी शासनाला अनेक धाडशी निर्णय घ्यावे लागतील. जसे एफ.डी.आय., इतर विदेशी गुंतवणुकदारांना आपल्या देशात गुंतवणुक करण्यास अधिक प्रोत्साहन देणे, अधिकाधिक निर्यात वाढीसाठी व आयात घटवण्यासाठी प्रयत्न करणे जेणे करुन व्यापारातील तुट कमी होईल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या "रुपयाची समस्या" या जगप्रसिध्द ग्रथांत विनिमय दराच्या संदर्भात सखोल असे विश्लेषण केलेले आहे. डॉ.आंबेडकरांच्या मते, "भारतासाठी असा विनिमय दर असावा की, ज्यामुळे भारतातील बेकारी, दारीद्रये आणि आर्थिक विषमता कमी होईल". बाबासाहेबांचे या संदर्भातील विश्लेषण वरील ग्रंथात सविस्तर असे मिळते. विनिमय दराच्या स्थिरतेसाठी त्यांचे हे विश्लेषण आजही जसेच्या तसे लागु पडते. म्हणुन जर त्यांच्या विचारांचे अनुकरण शासनाने केले तर अलिकडील काळात भारत देश निश्चितच रुपया मजबुत करण्यात यशस्वी होऊ शकेल.

**संदर्भ**

१. भारतीय अर्थव्यवस्था : भोसले आणि काटे
२. भारतीय अर्थव्यवस्था : डॉ.एस.व्ही.ढमढेरे
३. आर.बी.आय. चे संकेत स्थळ
४. आर.बी.आय. २०१४ चा प्रसिध्द केलेले अहवाल.
५. भारतीय अर्थव्यवस्था : प्रतियोगिता दर्पण (वार्षिकांक) २०१४



Scanned with OKEN Scanner